**पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी – ४११ ०१८.**

वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय

दुरध्वनी क्र. ०२०६७३३३३३३ **E-mail – medical@pcmcindia.gov.in**


## -: जाहीरात :-

### थेट मुलाखत ( WALK IN INTERVIEW )

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वैदयकिय विभागाचे अंतर्गत असणारे नविन थेरगाव रुग्णालय , नविन जिजामाता रुग्णालय , ह.भ.प मल्हारराव कुटे रुग्णालय,आकुर्डी व नविन भोसरी रुग्णालय , तालेरा रुग्णालय , यमुनानगर रुग्णालय व सांगवी रुग्णालय व इतर ठिकाणी कामकाजाकरीता पात्र व इच्छुक तज्ञ वैदयकिय अधिका-यांची करारनामा करुन कत्रांटी पद्धतीने ११ महिने कालावधीसाठी पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात महापालिकेच्या रुग्णालयात विविध विभागाकरिता आवश्यकतेनुसार तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यासाठी दिनांक - **२२/०६/ २०२२ ते दिनांक - २४/०६/२०२२** अखेर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० तसेच त्यापुढील प्रत्येक सोमवारी उपलब्ध जागानुसार खालील पदासाठी मार्किंग पॅटर्ननुसार थेट मुलाखती (**walk in interview** ) आयोजीत करण्यात आलेल्या आहेत. तरी पात्र व इच्छुक तज्ञ वैदयकिय अधिका-यांनी मुलाखतीस उपस्थीत रहावे.

| अ.क्र | विभाग | पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन / ठोक वेतन र.रु. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्रीरोग विभाग | स्त्रीरोगतज्ञ (कन्स्टंल्टन्ट) | १३ | १.M.D/DNB(Obst.&Gynaecology) पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.M.D/DNB(Obst.&Gynaecology) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक | १,२५,०००/ | अ.जा-२, अ.ज.-१, तदनंतर १,विजा-अ, भज-ब , भज-क, भज-ड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-३, इडब्ल्युएस-१, खुला - ०५ |
| | | रजिस्ट्रार ( स्त्रीरोग विभाग ) | १३ | १.M.S/DNB(Obst.&Gynaecology) पदवी / D.G.O. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक. | १,००,०००/ | अ.जा-२, अ.ज.-१, तदनंतर १,विजा-अ, भज-ब , भज-क, भज-ड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-३, इडब्ल्युएस-१, खुला - ०५ |
| | | हाऊसमन | २४ | १. MBBS पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.किमान सहा महिने संबधित विषयाचा अनुभव असणे आवश्यक | ८००००/- | अ.जा-३, अ.ज -२, , विजा(अ)-१, भज(ब) - १ तदनंतर १ , भज(क), भज-ड व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-५, इडब्ल्युएस-२, खुला - ०९ |
| २ | भुलतज्ञ विभाग | भुलतज्ञ ( कन्सल्टंट ) | १२ | १.M.D./DNB (Anaesthesia) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.M.D./DNB(Anaesthesia) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक | १२५०००/- | अ.जा-२, अ.ज.-१, तदनंतर १,विजा(अ) भज(ब) , भज(क) , भज-(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-२, इडब्ल्युएस-१, खुला - ०५ |
| | | रजिस्ट्रार (भुलतज्ञ विभाग) | १२ | १. M.S/DNB (Anaesthesia) ही पदवी/ DA. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक. | १०००००/- | अ.जा-२, अ.ज.-१, तदनंतर १,विजा(अ) भज(ब) , भज(क) , भज-(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-२, इडब्ल्युएस-१, खुला - ०५ |
| ३ | बालरोग विभाग | बालरोग तज्ञ (कन्सल्टंट ) | १२ | १.M.D/DNB(Paediatrics) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.M.D/DNB(Paediatrics)उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक. | १२५०००/- | अ.जा-२, अ.ज.-१, तदनंतर १, विजा(अ) भज(ब) , भज(क) , भज-(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-२, इडब्ल्युएस-१, खुला - ०५ |
| | | रजिस्ट्रार (बालरोग विभाग ) | २२ | १.M.D/DNB (Paediatrics) ही पदवी / D.C.H. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक. | १०००००/- | अ.जा-३, अ.ज.-२, विजा(अ)-१ भज(ब)-१, तदनंतर-१ , भज(क), भज-(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-४, इडब्ल्युएस-२, खुला – ०८ |

| अ.क्र | विभाग | पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन / ठोक वेतन र.रु. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बालरोग तज्ञ | हाऊसमन | २२ | १.MBBS ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.किमान सहा महिने संबधित विषयाचा अनुभव असणे आवश्यक | ८००००/- | अ.जा-३, अ.ज.-२, विजा(अ)- १ भज(ब)-१ , तदनंतर – १ भज(क) , भज-(ड) व विमाप्र क्रमाने आळीपाळीने, इमाव-४, इडब्ल्युएस-२, खुला - ०८ |
| ४ | मेडीसिन | फिजिशिअन (कन्सल्टंट) | १२ | १.M.D./DNB (Medicine) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.M.D./DNB (Medicine) उत्तीर्ण झालेनंतर ६ महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक. | १,२५,०००/- | अ.जा-२, अ.ज.-१, तदनंतर १, विजा(अ) भज(ब) , भज(क) , भज-(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-२, इडब्ल्युएस-१, खुला - ०५ |
| | | रजिस्ट्रार (मेडीसिन विभाग ) | १२ | १.M.D./DNB (Medicine) / DTCD/TDD/DD ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक / DTMH / DPM उत्तीर्ण असणे आवश्यक | १,००,०००/- | अ.जा-२, अ.ज.-१, तदनंतर १, विजा(अ) भज(ब) , भज(क) , भज-(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, इमाव-२, इडब्ल्युएस-१, खुला - ०५ |
| ५ | क्ष किरण विभाग | रेडिओलॉजिष्ट (कन्स्टंल्टन्ट) | ५ | १) M.D/DNB(Radiology) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) M.D/DNB(Radiology) उत्तीर्ण झालेनंतर ६ महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक. | १,२५,०००/- | अ.जा व अ.ज.आळीपाळीने १ ,विजाभज (विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने १, , इमाव ०१, इडब्ल्युएस – ०१ , खुला - ०१ |
| | | रजिस्ट्रार | ५ | १) M.D/DNB(Radiology) ही पदवी / D.M.R.D./ D.M.R.E ही पदविका उत्तीर्ण | १०००००/- | अ.जा व अ.ज.आळीपाळीने १ ,विजाभज (विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने १, , इमाव ०१, इडब्ल्युएस – ०१ , खुला - ०१ |
| ६ | सर्जरी विभाग | सर्जन (कन्सल्टंट) | ४ | १.M.S/DNB (General surgery) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.M.S/DNB (General surgery) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक | १२५०००/- | अ.जा ०१ , अ.ज , विजाभज , (विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने ०१, , इमाव ०१, खुला - ०१ |
| | | रजिस्ट्रार | ४ | १.M.S/DNB(General surgery) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक. | १०००००/- | अ.जा ०१ , अ.ज , विजाभज ,(विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने ०१, , इमाव ०१, खुला – ०१ |
| ७ | अस्थिरोग विभाग | आर्थोपेडीक सर्जन (कन्सल्टंट) | ३ | १. M.S/DNB(Ortho) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.M.S/DNB(Ortho) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक | १२५०००/- | अ.जा , अ.ज ,विजाभज, (विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व विमाप्र ०१ , व इमाव व इडब्लुएस या क्रमाने आळीपाळीने ०१, खुला - ०१ |
| | | रजिस्ट्रार | ४ | १. M.S/DNB(Ortho) ही पदवी / D.Orhto ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक | १०००००/- | अ.जा ०१ , अ.ज , विजाभज ,(विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने ०१, , इमाव ०१, खुला - ०१ |

| अ.क्र | विभाग | पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन / ठोक वेतन र.रु. | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | नेत्ररोग विभाग | नेत्रतज्ञ (कन्स्टल्टंट ) | १ | १.M.S/DNB ( Ophthamology) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक. २.M.S/DNB ( Ophthamology) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक | १२५०००/- | आरक्षण लागु नाही. |
| | | रजिस्ट्रार | ३ | १. M.S/DNB(.Ophthamology ) ही पदवी / DOMS ही पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक. | १०००००/- | अ.जा , अ.ज ,विजाभज, (विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व विमाप्र आळीपाळीने -०१ , व इमाव व इडब्लुएस या क्रमाने आळीपाळीने ०१, खुला - ०१ |
| ९ | कान, नाक, घसा विभाग | रजिस्ट्रार | २ | १.M.S/DNB ( ENT) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक. २ M.S/DNB ( ENT) ही पदवी / DORL ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक | १०००००/- | अ.जा , अ.ज ,विजाभज, (विजाअ, भज-ब , भज-क , भज(ड) व इमाव , विमाप्र , इडब्ल्युएस , या क्रमाने आळीपाळीने -०१ , खुला - ०१ |
| १० | मानसोप-चार विभाग | कन्सल्टंट | १ | १.M.D/DNB Psychiatry ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक. २. M.D/DNB Psychiatry उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक | १२५०००/- | आरक्षण लागु नाही. |
| ११ | त्वचारोग विभाग | रजिस्ट्रार | १ | १.M.D/DNB skin ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक. . २. .M.D/DNB skin उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक | १०००००/- | आरक्षण लागु नाही. |

**टिप - उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार कामाचा अनुभव अट शिथिल करणेत येईल.**

<u>अर्ज स्विकारणे विषयक माहिती</u>

- **अर्ज स्विकारण्याचे ठिकाण – वैदयकीय विभाग प्रमुख यांचे कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, दुसरा मजला, वैदयकीय विभाग मुख्य कार्यालय, पिंपरी-१८**
- **walk in interview साठी उपस्थीतीची वेळ, दिनांक २२/०६/२०२२ ते दिनांक २४/०६/ २०२२ अखेर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत तसेच तेथुन पुढे दरसोमवारी walk in interview पद्धतीने सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत राहिल.**

<u>अटी – शर्ती</u>

१) सदर जाहिरात ही प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे मार्किंग पँटर्ननुसार गुणवत्ता यादीमधुन मानधन पद्धतीने आवश्यक संख्येने पदांच्या नियुक्त्या करणेत येतील.

२) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरिता कामकाज कालावधी ११ महिने राहिल.

३) सदरची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपातील असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुसार करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येवु नये.

४) वय वर्ष ६० वर्षे पुर्ण असणा-या उमेदवारांनी उपरोक्त नमुद पदासाठी अर्ज करु नयेत असे अर्ज अपात्र समजणेत येतील.

५) वरिल शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक राहील.

६) सदर पदाच्या कंत्राटी नेमणुका मार्किंग पँटर्ननुसार walk in interview द्वारे करण्यात येतील.

७) उमेदवारांची पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेवुन मुलाखतीस हजर रहाणे आवश्यक आहे. सदर उमेदवारांच्या नियुक्त्या मार्किंग पँटर्ननुसार करणेत येवुन त्यानुसार नियुक्त्या करणेत येतील. सदर अर्ज नमुना व मार्किंग पँटर्न नमुना मनपा वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८) उमेदवारांच्या जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची सांक्षाकिंत प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

९) उमेदवार मागसवर्गीय असलेल्या जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणकोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.

१०)अर्जदार महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. ( शासनमान्य )

११)विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज व पुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक,जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (through copy) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१२)निवड झालेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यात कॉन्ट्रॅक्ट कारारनामा नोटराईज्ड करुन दिल्यानंतर कंत्राटी पद्धतीने नेमणुक दिली जाईल.

१३)मुलाखतीसाठी येणा-या उमेदवारांना स्वर्चाने मुलाखतीसाठी उपस्थीत रहावे लागेल.

१४)वरिल पदे ही संपुर्णपणे कंत्राटी स्वरुपाची असल्याने या पदावर कायम स्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

१५)वरिल पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे सर्वस्वी अधिकार वैदयकिय विभाग प्रमुखांना राहतील.

१६)सदर पदांना नमुद केलेनुसार रुग्णालयाच्या सोईनुसार सेवा देणे बंधनकारक असेल तथापी पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार वैदयकिय विभाग प्रमुख तसेच रुग्णालय प्रमुख यांचे असतील. तसेच रजिस्ट्रार व हाऊसमन यांची कामकाजाची वेळ 24 X 7 या प्रमाणे अथवा रुग्णालयाचे नियंत्रीत अधिकारी यांनी नेमुन दिल्या प्रमाणे असेल.

१७)अपात्र ठरविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. बोलविलेल्या उमेदवारांस नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेले आहेत या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१८)पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे स्वत: कडे राखुन ठेवतील याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१९)महापालिकेच्या अस्थापनेवरील नियमीत कर्मचा-याच्या लाभदायी योजना कंत्राटी तज्ञ वैदयकीय अधिका-याना लागु होणार नाही.

२०)निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण न करणार आढळल्यास,गैरवर्तन करताना आढळल्यास, सेवा देण्यास टाळाटाळ केल्यास, रुग्णालयाची वेळ न पाळल्यास व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास नियुकती रद्द करणेत येईल.

२१)रुग्णालयीन वेळेनसार थम्ब इम्प्रेशन करणे बंधनकारक राहील . रुग्णालयीन वेळेत थम्ब मध्ये उशीर झाल्यास मनपा नियमानुसार नियमाधिन कारवाई करणेत येईल. तसेच रुग्णालयीन कामकाजाच्या तातडीच्या वेळेत रुग्णालयात उपस्थीत रहावे लागेल.

२२)मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्व सुचना कार्यालयास देणे बंधनकारक राहिल अन्यथा एक महिन्याचे मानधन मनपा कोषागारात जमा करणे बंधनकारक राहिल. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडुन गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

२३)नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकारी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८ यांना राहतील आणि निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर,कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखुन ठेवले आहे.

२४) सदर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असुन सदरहु भरती प्रक्रिया संदर्भात अधिक माहिती नमुद संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**सही/--**
**(राजेश पाटील)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८**

**जाहिरात क्रमांक – ७६**
**दिनांक - १३/०६/२०२२**
**जा.क्र -वैदय/३/कावि/ ४३५/२०२२**
**दिनांक १३/०६/२०२२**

# <u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

| फोटो |
|---|
| |

**प्रति,**
**मा. आयुक्त.**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८.

**विषय – करानामा करुन कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या ------------------------ या पदासाठी अर्ज**
**संदर्भ – वैद्यकिय विभागाकडील जाहिरात क्र.७६, दि. १३/ ०६/२०२२**

**महोदय,**

संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालय/दवाखान्यामध्ये करारनामा करून कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या ------------------------------ या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

**आडनाव        स्वत:चे नाव        वडील / पतीचे नाव**

१. संपूर्ण नाव :- ------------------------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

ई-मेल आय डी ------------------------------------------ मोबाईल क्रमांक ---------------------------------

३. जन्मतारीख : ------------------------------

४. लिंग : पुरुष ☐ ☐

५. सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय - होय/नाही
होय असल्यास दवाखाना/रुग्णालयाचे नाव------------------- पदनाम---------------

६. रजिस्ट्रेशन क्रमांक -------------------------------------

७. जात - प्रवर्ग –

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | OBC | SBC | EWS | OPEN |

८. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील –

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | संस्था | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

९. तांत्रिक व इतर अर्हता तपशील –१) ----------------------------------------------------------------
२) ----------------------------------------------------------------

१०. अनुभवाचा तपशील -

| अ.क्र | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता -दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन. तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ –        अर्जदाराची सही ----------------------------

दिनांक – / /२०२२.        अर्जदाराचे नाव -----------------------------

सहपत्रे – अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे  २) अनुभवाची प्रमाणपत्रे  ३) जात वैधता प्रमाणपत्र
४) अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र  ५) इतर कागदपत्रे